# निमा हाऊस, आयटीआय जवळ, सातपूर, नाशिक-७ येथे दि. १५ मार्च,२०११ रोजी दु.१२.०० वाजता जिल्हा पुनर्वसन अधिकारी, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे इतिवृत्त.

सभेस उपस्थित असलेल्या सभासदांची / उद्योजकांची यादी सोबत जोडली आहे.

सभेच्या सुरवातीस महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र तथा सदस्य-सचिव, जिल्हा उद्योग मित्र समिती, नाशिक यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करून मा.अध्यक्षांचे परवानगीने सभेच्या कामकाजास सुरूवात केली. त्यात खालीलप्रमाणे विषयांवर चर्चा करून निर्णय घेण्यांत आले.

प्रथम मागील दि.१५ जून, २०१० रोजी निमा हाऊस येथे झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले. त्यानंतर इतिवृत्तावर केलेल्या कार्यवाहीचा आढावा खालीलप्रमाणे घेण्यात आला.

| क्र | औद्योगिक संघटनेचे नांव | मुद्या | बैठकीतील चर्चा व निर्णय | कार्यवाही संबंधित खाते |
|---|---|---|---|---|
| १ | नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्यु.असो. | नाशिक जिल्ह्यात उद्योगासाठी जागा उपलब्ध करणे. | नाशिक जिल्ह्यातील अंबड, सातपूर व सिन्नर औद्योगिक वसाहत क्षेत्रात जागा उपलब्ध नाही. या परिसरात उद्योजकांची भूखंडाची मागणी आहे. अंबड औद्योगिक वसाहतीस लागून असलेल्या चुंचाळे, सारूळ, विल्होळी शिवारातील असलेली पांजरापोळची २००० एकर जागा तसेच गोंदे दिंडोरी पेठरोड, त्र्यंबकरोड, ईगतपूरी, सुरगाणा येथे औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यांत यावे अशी उद्योजकांची मागणी असल्याने यावर प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक यांनी सभेत सांगितले की, गोंदे व वाडीव-हे येथील जागा संपादनाबाबत चॅप्टर ६ प्रमाणे कार्यवाही झाली आहे, चुंचाळे शिवारातील बागायती क्षेत्र सोडून इतर क्षेत्रासाठी प्रस्ताव मुख्यालयास सादर केलेला आहे, दिंडोरी येथील ३८६ हेक्टर जमीन संपादनासाठी नोटीफिकेशन झाले आहे, सिन्नर येथे अतिरिक्त २००० हेक्टर जमीन संपादनाची कार्यवाही सुरू आहे व ब-याच प्रमाणात कामे | प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | प्रगतीपथावर असल्याचे प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक यांनी सभेत सांगितले. यावर निमाचे सरचिटणीस श्री.धनंजय बेळे यांनी सांगितले की, चुंचाळे शिवारातील जमीन संपादनाची कार्यवाही त्वरीत सुरू करावी, ही जमीन शासनाचीच आहे, तसेच यासाठी औद्योगिक संघटना, मा.जिल्हाधिकारी व प्रादेशिक अधिकारी, मऔविम यांची संयुक्त बैठक घेतल्यास हा प्रश्न लवकर मार्गी लागेल असेही त्यांनी सांगितले. यावर मा.जिल्हाधिकारी यांचेसी चर्चा करून निर्णय कळविणेत येईल असे प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक यांनी सांगितले. | |
| २ | नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्यु.असो. | फायर ना हरकत दाखला व फायर चार्जेस रद्द करणे | सातपूर व अंबड औद्योगिक क्षेत्र हे मुख्यत्वे इंजिनिअरींग झोन आहे. फायर ॲक्टनुसार इमारत आराखडा मंजूर करतांना एमआयडीसी मोठ्या प्रमाणावर फायर चार्जेस वसुल करते. तसेच ना हरकत दाखला देतांना अग्निशमन यंत्रणा, पाण्याची टाकी इ.खर्चीक कामे त्यात टाकण्यात येतात. तसेच अग्निशमनसाठी एमआयडीसीची कोणताही यंत्रणा नाही.तसेच नाशिक महानगरपालिकेस घरपट्टीसोबत फायर सेस भरण्यात येतो, त्यामुळ एकाच वेळी एकाच प्रयोजनासाठी दोन यंत्रणांकडे कर मागणी उचित नाही. तसेच दरवर्षी नाशिक औद्योगिक क्षेत्रात ५ ते ६ कारखान्यांना आग लागते, त्यामुळे उद्योजकांच्या तीव्र भावनांचा विचार करून एमआयडीसीने अग्निशमन सुविधा पुरवावी किंवा फायर सेस आकारू नये. यावर कार्यकारी अभियंता, मऔविम, नाशिक यांनी सांगितले की, ही बाब धोरणात्मक आहे. याविषयीचा प्रस्ताव मुख्यालयाच्या अग्निशमन संबंधीत विभागास सादर करण्यांत येईल. | कार्यकारी अभियंता, मऔविम, नाशिक. |
| ३ | नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्यु.असो. | सातपूर व अंबड येथे औद्योगिक नगरी स्थापन करणे बाबत | मा.हायकोर्ट, औरंगाबाद यांनी स्वतंत्र औद्योगिक नगरी स्थापन करण्याचा निर्णय दिला आहे. शासनाचे परिपत्रक क्र.११९०९/५२/०९/एनव्ही-२५०७, दि.२२/६/२००९ प्रमाणे औद्योगिक नगरी घोषित केलेली आहे, त्यावर लवकरात लवकर कार्यवाही व्हावी अशी उद्योजकांची मागणी आहे. हा प्रस्ताव अद्याप शासन स्तरावर प्रलंबित आहे. | नगरविकास खाते, मंत्रालय, मुंबई. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ४ | नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्यु.असो. | सातपूर, अंबड, सिन्नर औद्योगिक क्षेत्रात ड्रेनेज सुविधा पुरविणे. | एमआयडीसी सातपूर, अंबड औद्योगिक क्षेत्रात ड्रेनेजची सुविधा नसल्याने सांडपाणी रस्त्यावरून वाहते, तसेच पावसाळ्याच पाणी उद्योजकांच्या कारखान्यात शिरते. गोदावरी विकास कृती आराखडा अंतर्गत औद्योगिक क्षेत्रातील ड्रेनेजचे काम होवू शकते. यावर कार्यकारी अभियंता, मऔविम, नाशिक यांनी प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक, कार्यकारी अभियंता, मऔविम, मा.आयुक्त, नाशिक महानगरपालिका व मा.प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांची संयुक्त बैठक घेवून हा प्रश्न निकाली काढावा असे सूचीत केले.<br>तसेच सुवर्ण लघु उद्योग योजना मधील उद्योजकांनी त्यांची समस्या सभेत मांडली. त्यावर या परिसरात सांडपाण्यासाठी मऔविमने त्वरीत ड्रेनेज लाईन करून द्यावी असे मा.अध्यक्षांनी सूचीत केले.<br>तसेच सातपूर येथील प्लॉट नं.२८ येथील ड्रेनेज संबंधीचा प्रस्ताव मऔविम मुख्यालयाने नाकारला आहे त्याविषयी एमआयडीसीने योग्य त-हेने प्रस्ताव पुन्हा शिफारस करावे असे सूचीत करण्यात आले.<br>एमआयडीसीने कोणत्याही परिस्थितीत मऔविम अंबड क्षेत्रातील सुवर्ण लघु उद्यचोग योजना, अंबड व सातपूर येथील प्लॉट नं.२८ चे क्षेत्रात कोणत्याही परिस्थितीत ड्रेनेज सुविधा पुरवाव्यात अशी उद्योजकांनी मागणी केली. आजच्या सभेचा संदर्भ देवून प्रस्ताव पुन्हा शिफारस करण्यांत येईल असे कार्यकारी अभियंता, मऔविम, नाशिक यांनी सभेत सांगितले. | कार्यकारी अभियंता, मऔविम, नाशिक. |
| ५ | नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्यु.असो. | सांडपाण्याचे शुद्धीकरणासाठी भूखंड आरक्षित करणे बाबत | नाशिक येथे इंजिनिअरींग उद्योग असून उद्योगांचे सांडपाणी रस्त्यावर वाहते. यासाठी निमा व मेटल फिनिशर्स असोसिएशन यांनी त्यांच्या मागणीनुसार एकत्रित अभ्यास करून सामुहिक सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाबाबत प्रस्ताव एमआयडीसीकडे सादर करावा असे मागील सभेत सांगण्यात आले होते. या प्रकल्पासाठी सातपूर व अंबड येथे भूखंड आरक्षित केले आहेत व इटीपीचा प्रस्ताव तयार करण्यात येत आहे असे कार्यकारी अभियंता, मऔविम,नाशिक यांनी सांगितले. | कार्यकारी अभियंता, मऔविम, नाशिक. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६ | नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्यु.असो. | एमआयडीसीने पाण्याचे किमान दर आकारणे बाबत | एमआयडीसीचे पाणी बिलाचे ऑडिट ५-१० वर्षांना करते व त्यांनंतर ऑडिटच्या रिपोर्ट मिळाल्यानंतर उद्योजकांना मागील थकबाकी भरण्यासाठी बिले पाठविली जातात. मागील ऑडिटवर आधारीत थकबाकी मागणी करू नये अशी उद्योजकांनी मागणी केले. त्यासाठी एमआयडीसीने दरवर्षी ऑडिट केल्यास उद्योजकांकडून थकबाकी वसूल करण्याची वेळ येणार नाही.तसेच नियमित बिले व थकबाकीची बिले स्वतंत्ररित्या अदा करावीत असे सूचित करण्यांत आले. | कार्यकारी अभियंता, मऔविम, नाशिक. |
| ७ | नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्यु.असो. | भूखंड हस्तांतरणास लवकरात लवकर परवानगी मिळावी | बंद स्थितीत असलेले उद्योग किंवा जे आजारी उद्योग असतील अशा उद्योगांचे हस्तांतरण झाल्यास नवीन उद्योग सुरू होवू शकतील.ज्या भूखंडांवर कामगारांचे प्रश्न प्रलंबित नसतील त्यास त्वरीत हस्तांतरणाची परवानगी मिळावी अशी उद्योजकांची मागणी आहे. यावर, पुर्वीची अट दिनांक १८-८-२०१० पासून शिथिल करण्यात आली असून कारखानदारांकडून आता शपथपत्र घेण्यात येते अशी माहिती कामगार विभागाचे प्रतिनिधी यांनी सभेत दिली. | कामगार उपायुक्त, नाशिक |
| ८ | नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्यु.असो. | जकात कर रद्द करणे बाबत | महाराष्ट्रात मुल्यवर्धीत (व्हॅट) कर प्रणाली लागू करण्यात आल्यानंतर इतर कर रद्द होणे अपेक्षित होते मात्र तसे झाले नाही. महाराष्ट्रात महानगरपालिका क्षेत्रात जकात कर लागू असल्याने बरेच उद्योग महाराष्ट्राबाहेर गेले आहेत.त्यामुळे जकात कर रद्द करण्यात यावा. तसेच नाशिक येथील जकात वसुलीचे खाजगीकरण करण्यात येवू नये अशी उद्योजकांनी मागणी केली. याविषयी सभेत ठराव करणेत यावा व तो शासनाकडे शिफारस करावा असे सूचीत केल्याप्रमाणे ठराव संमत करणेत आला व तो शासनाकडे शिफारस करण्याचे ठरले. | महाराष्ट्र शासन विक्रीकर विभाग /मा.आयुक्त, नाशिक महानगरपालिका |
| ९ | नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्यु.असो. | कायमस्वरूपी औद्योगिक प्रदर्शन केंद्र उभारणे | नाशिक हे औद्योगिक पर्यटन स्थळ होण्यासाठी कायमस्वरूपी औद्योगिक प्रदर्शनाची उभारणी करावी. याविषयीचा प्रस्ताव मुख्यालयास शिफारस करण्यात येईल असे प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक यांनी सभेत सांगितले. | प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १० | नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्यु.असो. | कामगार संघटनांचा त्रास रोखणे | नाशिकमध्ये कामगार संघटनांकडून त्रास फारच मोठ्या प्रमाणात सुरू असून आजच मंगेश इंडस्ट्रीजचे संचालक यांचेवर दगडफेक करण्यात आली. कामगार संघटनांमुळे त्रस्त असणा-या उद्योजकांना पुरेसे पोलीस संरक्षण मिळावे, याबाबत मा.पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांना त्वरीत पत्र देण्यात यावे असे ठरले. | जिल्हा उद्योग केंद्र, नाशिक. |
| ११ | नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्यु.असो. | औद्योगिक क्षेत्रात अखंडीत विद्यूत पुरवठा देणेत यावा. | महावितरणचे कोणीही प्रतिनिधी सभेस उपस्थित नव्हते. त्यामुळे या विषयावर चर्चा होवू शकली नाही. त्यामुळे उद्योजकांनी निषेध व्यक्त केला. | मुख्य अभियंता, महावितरण, नाशिक. |
| १२ | नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्यु.असो. | ५० पेक्षा कमी कामगार असणा-या उद्योगांना कामगार कायद्यातून सुट मिळावी. | हा विषय धोरणात्मक स्वरूपाचा आहे. परंतू आजच्या सभेचा संदर्भ देवून ५० पेक्षा कमी कामगार असणा-या उद्योगांना कामगार कायद्यातून सुट मिळणेबाबतचा प्रस्ताव संबंधीतांकडे शिफारस करावा असे मा.अध्यक्षांनी उपस्थित कामगार विभागाचे प्रतिनिधी यांना सूचीत केले. | कामगार उपायुक्त, नाशिक. |
| १३ | नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्यु.असो. | भूखंड धारकांना भूखंड कार्ड द्यावे | हा विषय शासन स्तरावर प्रलंबित आहे असे प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक यांनी सांगितले. | प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक. |
| १४ | नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्यु.असो. | उद्योग विस्तारासाठी एफएसआय २.० करण्यास परवानगी मिळावी. | हा विषय शासन स्तरावर प्रलंबित आहे असे कार्यकारी अभियंता, मऔविम, नाशिक यांनी सांगितले. | एमआयडीस/ नगर विकास विभाग |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १५ | नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्यु.असो. | ओझर येथे आंतरराष्ट्रीय विमानसेवा उपलब्ध व्हावी. | सदर विषय केंद्र शासनाच्या नागरी उड्डाण विभागाशी संबंधीत असल्याने त्यांचेकडे पाठपुरावा करण्यात यावा असे सूचीत करण्यांत आले. | एमआयडीसी / एचएएल व नागरी उड्डाण विभाग. |
| १६ | नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्यु.असो. | पुणे ते सुरत व्हाया नाशिक रेल्वे मार्गाचा विकास व्हावा. | हा विषय केंद्र शासनाच्या रेल्वे मंत्रालयाशी संबंधीत असल्याने रेल्वे मंत्रालयाकडे पाठपुरावा करणेत यावा असे मा.अध्यक्षांनी सूचीत केले. | जिल्हा उद्योग केंद्र, नाशिक./ जिल्हाधिकारी कार्यालय. |
| १७ | ॲडव्हान्टेज नाशिक फाऊन्डेशन | राष्ट्रीय महामार्गासाठी जागा उपलब्ध करून देणे | गोंदे व वाडीव-हे येथे औद्योगिक क्षेत्र स्थापनेसाठी नियोजित जमीन संपादनाच्या कामास असलेली स्थगिती उठविण्यात येवून नवीन जागा उपलब्ध करून देण्यात यावी. याबाबत राष्ट्रीय महामार्ग विभाग क्र.९ यांचे कोणाही प्रतिनिधी सभेस उपस्थित नसल्याने चर्चा होवू शकली नाही. | राष्ट्रीय महामाग विभाग क्र.९, सा.बां. विभाग, नाशिक. |
| १८ | ॲडव्हान्टेज नाशिक फाऊन्डेशन | व्हॅट लागू नसलेल्या उद्योगांना अनुदान मिळणे बाबत | सामुहिक प्रोत्साहन योजना-२००७ अंतर्गत भांडवली अनुदान बंद करण्यात आले असून त्याऐवजी मुल्यवर्धीत कराशी निगडीत इंडस्ट्रीयल प्रमोशन सबसिडी देण्यात येते. ज्या उद्योगांना मुल्यवर्धीत कर लागू नाही अशा उद्योगांना पुर्वी प्रमाणेच भांडवली अनुदान मिळावे, याविषयी नवीन धोरण निश्चितीचे काम सूरू असल्याचे महाव्यवस्थापक, जिउकें यांनी सभेत सांगितले. | उद्योग विभाग, महाराष्ट्र शासन. |
| १९ | महाउद्योग मित्र औद्योगिक संस्था, नाशिक. | अंबड एमआयडीसी क्षेत्रामध्ये जे लघु उद्योग भाड्याचे जागेत सुरू आहेत त्यांना तयार गाळे उपलब्ध करून देणे. | एमआयडीसीकडे संस्थेच्या २२३ लघु उद्योगांच्या यादीसह भूखंड मागणीबाबतचा प्रस्ताव सादर केलेला असून त्यांना एमआयडीसी क्षेत्रात मोक्याच्या ठिकाणी गाळे उपलब्ध करून द्यावेत. याबाबत या २२३ उद्योजकांची सविस्तर माहिती प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक यांचेकडे देणेत यावी असे त्यांनी सूचीत केले. तसेच या गाळ्याचे दर अद्याप निश्चित झालेले नाहीत. | महाउद्योग मित्र औद्योगिक संस्था, नाशिक./ प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २० | सिन्नर तालुका औद्यो.सह. वसाहत. | विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) सिन्नर | मौजे मुसळगाव, ता.सिन्नर शिवारातील जमीन गट न.१००५यअ-१ ही जमीन सिन्नर सहकारी औद्योगिक वसाहतीने औद्योगिक वापरासाठीच घेतल्याने एमआयडीने हा एरिया डी-नोटीफाईड केलेला आहे असे प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक यांना सांगितले. | प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक. |
| २१ | | नाशिक-सिन्नर रस्त्याचे चौपदरीकरण करणे | नाशिक-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील नाशिक ते सिन्नर या टप्प्याचे चौपदरीकरणे तातडीने होणे गरजेचे आहे. याबाबत राष्ट्रीय महामार्ग विभाग क्र.९ चे कोणीही प्रतिनिधी सभेस उपस्थित नसल्याने या विषयावर चर्चा होवू शकली नाही. | राष्ट्रीय महामार्ग विभाग क्र.९, सा.बां. नाशिक. |
| **सभेपुढे आलेले नवीन विषय** | | | | |
| १ | नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्यु.असो. | महानगरपालिकेच्या प्रस्तावित १८ मीटर डीपी रोडमुळे प्लॉट नं.११६ ते १२५ बाधीत होत असल्याबाबत | सातपूर औद्योगिक वसाहतीतील एफ सेक्टर मधील महानगरपालिकेच्या प्रस्तावित १८ मीटर डीपी रोडमुळे प्लॉट नं.११६ ते १२५ हे उद्योजकांचे प्लॉट बाधित होत आहेत.त्यास उद्योजकांचा विरोध असून एमआयडीसीने देखील पाठपुरावा केला आहे. परंतू महानगरपालिकेकडून ठोस उत्तर मिळत नाही. महानगरपालिकेचे संबंधीत अधिकारी सभेस उपस्थित नसल्याने सदर विषयाबाबत मा.आयुक्त यांना पत्र देवून पाठपुरावा करावा असे मा.अध्यक्षांनी सूचीत केले. | मा.आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक. |
| २ | नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्यु.असो. | ज्वालाग्रही पदार्थ स्टोअर करण्यासाठी घ्याव्या लागणा-या एनओसी बाबत | ज्वालाग्रही पदार्थ स्टोअर करण्यासाठी घ्याव्या लागणा-या लायसेन्सकरिता मा.जिल्हाधिकारी व इतर संबंधीत अधिका-यांच्या एनओसी घेण्यासाठी वेळ लागतो. याविषयी एनओसी मिळण्यासाठी ३० दिवसांची अट टाकण्यात येईल व ३० दिवसांच्या आत एनओसी नाही मिळाल्यास संबंधीत कार्यालयाची हरकत नाही असे गृहित धरण्यात येईल असे निमाचे सरचिटणीस श्री.धनंजय बेळे यांना सांगितले. याविषयी मा.जिल्हाधिकारी यांचेशी चर्चा करणेत येईल असे मा.अध्यक्षांनी सांगितले. | मा.जिल्हाधिकारी, नाशिक. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३ | अंबड इंडस्ट्रीज अँड मॅन्यु. असो.अंबड | अंबड औद्योगिक वसाहतीमधील शेड क्र.डब्ल्यू-१ ते डब्ल्यू-४० जवळील सांडपाण्याबाबत | अंबड औद्योगिक वसाहतीमधील शेड क्र.डब्ल्यू-१ ते डब्ल्यू-४० जवळील सांडपाण्याची लाईन चोकअप झालेली आहे त्यामुळे सांडपाणी रस्त्यावर येवून दुर्गंधी पसरली आहे. याविषयी आयमाने महानगरपालिकेच्या अधिका-यांना अनेकवेळा दुरध्वनी करून कळविले परंतू अद्याप कार्यवाही झालेली नाही. याविषयी महानगरपालिकेच्या संबंधीत अधिका-यांना पत्र देवून त्वरीत कार्यवाही करणेविषयी कळवावे असे मा.अध्यक्षांनी सूचीत केले. | नाशिक महानगरपालिका, ड्रेनज विभाग. |
| ४ | अंबड इंडस्ट्रीज अँड मॅन्यु. असो.अंबड | अंबड औद्योगिक वसाहतीमधील खराब रस्ते दुरूस्त करणे बाबत | अंबड औद्योगिक वसाहतीमधील डब्ल्यू सेक्टर, ई सेक्टर व एफ सेक्टरमधील रस्ते अत्यंत खराब झालेले आहेत व ते रस्ते दुरूस्त करणेबाबत महानगरपालिकेच्या संबंधित अधिका-यांना अनेकवेळा कळविले आहे परंतू सदर रस्ते अद्याप दुरूस्त करण्यांत आलेले नाहीत. याविषयी महानगरपालिकेच्या संबंधित अधिका-यांना पत्र देवून त्वरीत कार्यवाही करणेविषयी कळवावे असे मा.अध्यक्षांनी सूचीत केले. | |
| ५ | अंबड इंडस्ट्रीज अँड मॅन्यु. असो.अंबड | अंबड औद्योगिक वसाहतीमध्ये शहर बससेवेच्या जादा फे-या वाढविणे बाबत | अंबड औद्योगिक वसाहतीमध्ये शहराच्या विविध भागातून कामगार येत असतात. त्यांचेसाठी<br>(१) बोरगड (म्हसरूळ ते इनोव्हा डोंगरापर्यन्त सकाळी ७ ते ९ दरम्यान व संध्याकाळी ६ ते ८ दरम्यानं<br>(२) दिंडोरी रोड वरील आरोग्य विज्ञान विद्यापिठ परिसर ते अंबड सकाळी ७ व संध्याकाळी ६ वाजता.<br>(३) निमाणी -सातपूर मार्गे गरवारे ते पाथर्डी फाटा पर्यन्त बसफेरी वाढविणे<br>(४) बसला नियमित नाव फलक लावणे<br>(५) अंबड औद्योगिक वसाहतीमधील प्रत्येक बसथांब्यावर बस वेळापत्रक लावणे<br>(६) अंबड औद्योगिक वसाहतीत चक्री बस सुरू करणे. | आगार व्यवस्थापक, शहर बस सेवा, म.रा.मार्ग परिवहन महामंडळ, नाशिक. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | अशी मागणी आयमाने या समितीस कळविली आहे. याविषयी एसटीचे संबंधीत विभागास पत्र देवून कार्यवाही करणेस कळवावे असे मा.अध्यक्षानी सूचीत केले.<br>तसेच एसटी महामंडळाने सिन्नर साठी मागणीप्रमाणे बससेवा उपलब्ध करून दिली त्याबद्दल उद्योजकांनी महामंडळाच्या संबंधीत अधिका-यांचे आभार मानले. | |
| | **आयत्या वेळचे विषय** | | | |
| १ | अष्टविनायक लघु उद्योग सोसायटी अंबड | अष्टविनायकलघु उद्योग सोसायटी अंबड मधील उद्योग घटकांचे लीजबाबत | अष्टविनायक लघु उद्योग सोसायटी अंबड चे बाबतीत एमआयडीसी व सोसायटीमध्ये लीज झालेले आहे. सोसायटी व सभासद यांचेमधील लीज बाकी आहे. परंतू सोसायटीचे मुख्य प्रवर्तक लीज करीत नाहीत अशी समस्या उपस्थित उद्योजकांनी मांडली. यावर प्रादेशिक अधिकारी मऔविम, नाशिक यांनी सदर सोसायटीस पत्र देवून सोसायटी व सभासद यांचेमधील लीज करणेस कळवावे असे मा.अध्यक्षांनी सूचविले. | प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक. |
| २ | निमा, सिन्नर | एमआयडीसी सिन्नर येथे ट्रक टर्मिनस सुरू करावे. | ट्रक टर्मिनल प्रोजेक्ट सुरू करणेबाबत आठ-दहा दिवसांत संबंधीतांची बैठक घेण्यात येईल असे प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक यांनी सभेत सांगितले. | प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक. |
| ३ | निमा, सिन्नर | मुख्य रस्ता ते एमआयडीसी रस्ता दुरूस्ती | एमआयडीसी सिन्नर परिसरातील मुख्य रस्ता ते एमआयडीसी एरियातील रस्ते दुरूस्त करण्यांत यावेत अशी उद्योजकांनी मागणी केली. यावर मुख्य रस्ते ते एमआयडीसी हा रस्ता दुरूस्तीसाठी टेन्डर नोटीस निघालेली आहे असे कार्यकारी अभियंता, मऔविम, नाशिक यांनी सभेत सांगितले. | कार्यकारी अभियंता, मऔविम, नाशिक. |

सर्व विषयावर सांगोपांग चर्चा झाल्यानंतर ज्या ज्या यंत्रणांशी संबंधीत प्रश्न आहेत, त्या त्या संबंधीतांनी सभेत झालेल्या चर्चेप्रमाणे त्वरीत कार्यवाही सुरू करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हा उद्योग केंद्रास सादर करावा असे मा.अध्यक्षांनी सूचीत केले.

येणेप्रमाणे सभेचे कामकाज झाल्यानंतर सर्व उपस्थितांचे आभार मानून सदस्य-सचिव यांनी मा.अध्यक्षांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र,नाशिक.

सही/-
जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
नाशिक.

(टिपः- स्थळप्रतीवर मा.अध्यक्ष व सदस्य-सचिव यांची स्वाक्षरी असे)

दिनांक १५ मार्च,२०११ रोजी निमा हाऊस, सातपूर, नाशिक-७ या ठिकाणी संपन्न झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समितीचे सभेस उपस्थित असलेल्या अधिकारी/ पदाधिकारी, उद्योजकांची यादी.

मा.श्री.विनय गोसावी, जिल्हा पुनर्वसन अधिकारी, नाशिक.
मा.श्री.पी.पी.दाबेराव, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र,नाशिक
मा.श्री.आर.एम.खेडकर, प्रादेशिक अधिकारी, मऔविम, नाशिक.
मा.श्री.एस.आर.तुपे, कार्यकारी अभियंता, मऔविम, नाशिक.
मा.श्री.बी.आर.शिंपले, प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नाशिक.
मा.श्री.धनंजय जामदार, उपसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभाग, नाशिक.
मा.सौ.अंजली अडे, सहाय्यक संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य विभाग, नाशिक.
मा.श्री.पी.बी.सावळे, प्रतिनिधी, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ,नाशिक.
मा.श्री.गजानन पळसोदकर, प्रतिनिधी, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र,नाशिक.
मा.श्री.डी.टी.पाटील, प्रतिनिधी, कामगार उपायुक्त, नाशिक.
मा.श्री.नरेन्द्र हिरावत, अध्यक्ष, नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्यु.असो.(निमा) नाशिक.
मा.श्री.धनंजय बेळे, सरचिटणीस, अध्यक्ष, नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्यु.असो.(निमा) नाशिक.
मा.श्री.ज्ञानेश्वर गोपाळे, अध्यक्ष, अंबड इंडस्ट्रीज अँड मॅन्यु.असो.(आयमा), अंबड.
मा.श्री.संजय नारंग, व्हाईस चेअरमन, नाशिक औद्योगिक सहकारी वसाहत मर्यादित,नाशिक.
मा.श्री.उन्मेष कुलकर्णी, सचिव, अंबड इंडस्ट्रीज अँड मॅन्यु.असो.(आयमा), अंबड.
मा.श्री.अरून चव्हाणके, निमा, सिन्नर.
मा.श्री.सुधीर बडगुजर, निमा, सिन्नर.
मा.श्री.मधुकर ब्राम्हणकर, माजी अध्यक्ष, निमा.
मा.श्री.जयप्रकाश जोशी, मे.जोटो ॲबैसिव्हज प्रा.लि., नाशिक.
मा.श्री.राजेन्द्र अहिरे, निमा.
व इतर उद्योजक

नाशिक.
दिनांक :- ३१/५/२०११.

**सविनय सादरः-**

विषयः- जिल्हा उद्योग मित्र समिती
जिल्हा आजारी उद्योग पुनरूज्जीवन समिती
स्थानिक लोकांना रोजगार-जिल्हा समिती.
---------------------------------------
दिनांक १५/३/२०११ चे इतिवृत्त..

दिनांक १५ मार्च, २०११ रोजी निमा हाऊस, आयटीआय जवळ, सातपूर, नाशिक-७ येथे आपल्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या वरील सभांचे इतिवृत्त सोबत मान्यतेसाठी सादर करण्यांत येत आहेत. कृपया मान्यता मिळावी ही विनंती.

महाव्यवस्थापक,जिउकें,
तथा सदस्य-सचिव,
जिल्हा उद्योग मित्र समिती, नाशिक.

जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
नाशिक.

जा.क्र.जिउकेंना/जिउमि/इतिवृत्त/२०११/२७०७
महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नाशिक
यांचे कार्यालय,सातपूर,नाशिक-४२२००७.
दिनांकः- ७ जून, २०११.

प्रति,

विषयः- जिल्हा उद्योग मित्र समिती सभा..
दिनांक १५/३/२०११ चे इतिवृत्त.

महोदय,

विषयांकित सभेचे इतिवृत्त सोबत जोडून पाठविण्यात येत असून आपल्या खात्याशी संबंधीत मुद्यावर चर्चा झाल्याप्रमाणे कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या समितीस पाठविण्यात यावा ही विनंती.

आपला विश्वासू,

महाव्यवस्थापक, जिउकें
तथा सदस्य-सचिव,
जिल्हा उद्योग मित्र समिती,नाशिक

प्रत माहितीसाठी सविनय सादरः-
१. मा.जिल्हाधिकारी, नाशिक.
२. मा.निमंत्रक, राज्य उद्योग मित्र , उद्योग संचालनालय, मुंबई-३२.
३. मा.उद्योग सह संचालक, नाशिक विभाग, नाशिक.

जा.क्र.जिउकेंना/जिआपुस/इतिवृत्त/२०११/२७७७
महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नाशिक
यांचे कार्यालय,सातपूर,नाशिक-४२२००७.
दिनांकः- ७ जून, २०११.

प्रति,

विषयः- जिल्हा आजारी उद्योग पुनरूज्जीवन समिती सभा..
दिनांक १५/३/२०११ चे इतिवृत्त.

महोदय,

विषयांकित सभेचे इतिवृत्त सोबत जोडून पाठविण्यात येत असून आपल्या खात्याशी संबंधीत मुद्यावर चर्चा झाल्याप्रमाणे कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या समितीस पाठविण्यात यावा ही विनंती.

आपला विश्वासू,

महाव्यवस्थापक, जिउकें
तथा सदस्य-सचिव,
जिल्हा आजारी उद्योग पुनरूज्जीवन समिती,
नाशिक

प्रत माहितीसाठी सविनय सादरः-
१. मा.जिल्हाधिकारी, नाशिक.
२. मा.उद्योग सह संचालक (जिउकें शाखा), उद्योग संचालनालय, मुंबई-३२.
३. मा.उद्योग सह संचालक, नाशिक विभाग, नाशिक.

जा.क्र.जिउकेंना/स्थालोरो/इतिवृत्त/२०११/२७९२
महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नाशिक
यांचे कार्यालय,सातपूर,नाशिक-४२२००७.
दिनांकः- ७ जून, २०११.

प्रति,

विषयः- स्थानिक लोकांना रोजगार-जिल्हा समिती सभा..
दिनांक १५/३/२०११ चे इतिवृत्त.

महोदय,

विषयांकित सभेचे इतिवृत्त सोबत जोडून पाठविण्यात येत असून आपल्या खात्याशी संबंधीत मुद्यावर चर्चा झाल्याप्रमाणे कार्यवाही करून केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या समितीस पाठविण्यात यावा ही विनंती.

आपला विश्वासू,

महाव्यवस्थापक, जिउकें
तथा सदस्य-सचिव,
स्थानिक लोकांना रोजगार-जिल्हा समिती,
नाशिक

प्रत माहितीसाठी सविनय सादरः-
१. मा.जिल्हाधिकारी, नाशिक.
२. मा.उद्योग सह संचालक (जिउकें शाखा), उद्योग संचालनालय, मुंबई-३२.
३. मा.उद्योग सह संचालक, नाशिक विभाग, नाशिक.